# कृषि संशोधन केंद्र, शिरगांव, ता. जि. रत्नागिरी

## निविदा सुचना (Tender Notice)

कृषि संशोधन केंद्र, शिरगांव, रत्नागिरी या संशोधन केंद्राच्या प्रक्षेत्रावरील पहारेकरी काम ठेका पध्दतीने करण्यासाठी दरपत्रके मागविणेत येत आहेत. इच्छुक ठेकेदारांनी **मा. प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र, शिरगांव, ता. जि. रत्नागिरी** यांचे नावे आपले दरपत्रक सिलबंद लखोटयातून **दिनांक २६.०९.२०२३** रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत या कार्यालयात सादर करावे.

| अ. क्र. | कामाचे स्वरुप | आवश्यक कंत्राटी मजुर युनिट/दिवस | कालावधी | ठेक्याची रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|
| १ | **कृषि संशोधन केंद्र, शिरगांव प्रक्षेत्रावरील पहारेकरी काम करणे तसेच त्याच कालावधीत पाणी व्यवस्थापन करणे, अधिकाऱ्यांच्या सुचनेनुसार प्रक्षेत्रावरील प्रासंगिक कामे करणे.** (दुपारी १२.०० ते १४.०० आणि संध्याकाळी १७.३० ते २३.३० अशा दोन शीप्ट मध्ये) | प्रति दिवस १ प्रमाणे १८१ दिवस १ मजुर युनिट | दि. ०३ ऑक्टोबर, २०२३ ते दि. ३१ मार्च, २०२४ | |

कामासंबंधीच्या अटी व शर्ती सोबत देण्यात आलेल्या आहेत.

जा.क्र.कृसंके/पहारेकरी/ 392 /२०२३
कृषि संशोधन केंद्र, शिरगांव, रत्नागिरी
पिन कोड – ४१५ ६२९
दिनांक – ०६.०९.२०२३

**प्रभारी अधिकारी,**
कृषि संशोधन केंद्र,
शिरगांव, रत्नागिरी.

प्रत – प्रसिध्दीसाठी रवाना –

१. कार्यालय नोटीस बोर्ड, कृषि संशोधन केंद्र, शिरगांव (रत्नागिरी).
२. कार्यालय नोटीस बोर्ड, मत्स्य महाविद्यालय, शिरगांव (रत्नागिरी).
३. नोटीस बोर्ड, ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय, शिरगांव (रत्नागिरी).
४. विद्यापीठ वेबसाईट : www.dbskkv.org.in

## ठेका पध्दतीने पहारेकरी कामे करणे संबंधिच्या या कार्यालयाच्या अटी/शर्ती

१. प्रक्षेत्रावरील कामे संबंधीत विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख विभागाच्या आवश्यकतेनुसार नेमून देतील त्याप्रमाणे करणे आवश्यक राहील.

२. कामाच्या देयकाची आदायगी महिना पूर्ण झाल्यावर केली जाईल. त्यासाठी देयक सादर करतेवेळी विभाग प्रमुख/प्रक्षेत्र अधिक्षक यांचे काम वेळेत पूर्ण केलेबाबतचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

३. निविष्ठांचा पुरवठा या विभागामार्फत केला जाईल.

४. ठेकेदाराकडे स्वत:चे पॅन कार्ड व बॅंक खाते असणे आवश्यक आहे. तसेच ठेकेदाराने कामगारांना कामाचे वेतन व त्याअनुष्यंगीक रक्कम संबंधीत कामगारांच्या बॅंक खाती जमा करणे आवश्यक आहे.

५. ठेकेदाराने नेमलेल्या मजूरांना शासनाच्या किमान वेतन दरानुसार किमान वेतन दिले जाते असे प्रमाणित करणे आवश्यक आहे.

६. प्रक्षेत्रावरील मालमत्तेचे कामगारांकडून नुकसान झाल्यास ठेकेदारास जबाबदार धरले जाईल.

७. ठेक्यामध्ये असलेल्या मजूरांव्यतिरिक्त प्रक्षेत्रावर गरजेनुसार जादा मजूर विहित कार्यपध्दती अवलंबून नेमण्याचा अधिकार संबंधित विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना राहील.

८. ठेक्यातील मजूरांची किमान व कमाल वयोमर्यादा शासन निर्णयानुसार निश्चीत केलेली असावी.

९. याचिका क्र. १५९१/२०१८ संदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई यांच्या दिनांक १८ एप्रिल, २०१८ च्या निर्णयानुसार अंतरिम स्थगितीस अनुसरून परिच्छेद क्र. ५१(ई) नुसार याचिकाकर्त्या मजूरांना ठेकेदाराने ठेक्यामध्ये सामावून घेणे आवश्यक आहे.

१०. ठेकेदारामार्फत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठ प्रशासनावर राहणार नाही.

११. ठेकेदार व्यक्तीस/संस्थेस उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.

१२. ठेक्यासंबधी इतर सर्व अधिकार विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांना/विद्यापीठ प्रशासनाला राहतील.

१३. कामाची वेळ दुपारी १२.०० ते १४.०० आणि संध्याकाळी १७.३० ते २३.३० अशा दोन शीप्ट मध्ये करावे लागेल.

१४. आपल्या पहारेकरी ठेका कालावधीत प्रक्षेत्रावरील कोणत्याही वस्तू गहाळ अथवा चोरीस गेल्यास व प्रक्षेत्रावरील प्रयोगिक पिकाचे मोकाट जनावरांनी नुकसान केल्यास आपणास जबाबदार धरण्यात येईल व झालेले नुकसान ठेक्याचे रक्कमेतून वसूल करण्यात येईल.

१५. कंत्राटी मजूरांचा अपघात विमा असणे आवश्यक आहे. व तसे प्रमाणपत्र कंत्राटदाराने देणे बंधनकारक आहे.

**प्रभारी अधिकारी**
कृषि संशोधन केंद्र
शिरगांव, रत्नागिरी